**नियमित दिवाणी दावा क्र.२०२/२०१५**
**निशाणी ५७ खाली**

**प्रतिदाव्यातील वादीतर्फे साक्षीदार क्र.१ याचा उलटतपास प्रतिदाव्यातील प्रतिवादीतर्फे वकील श्री.एस.के.देवडकर यांचेमार्फत शपथेवर सुरु**

१७. माझे वय ४७ वर्षे आहे. माझे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र माझ्या समक्ष झालेले आहे. मी किसन जगू देवडकर यांना ओळखतो. मी त्यांना ४० वर्षांपासून ओळखतो. मी किसन यांचे भाऊ यांना देखील ओळखतो. मी सध्या रहायला पुणे येथे आहे. मी ४० वर्षांपासून पुण्यात राहतो. गावी माझे घर आहे. गावी माझे घर पहिल्यापासून आहे आणि आता नवीन बांधलेले आहे. आता बांधलेले घर सन २०२२ मध्ये बांधलेले आहे. मला एक भाऊ आहे. त्याचे नाव भालचंद्र आहे. मला बहिण आहे. तिचे नाव रंजना किसन हिरवे आहे.

१८. माझ्या जमिनीचा गट नं.१६८ आहे. गट नं.१६८ च्या पुर्वेला गट नं.१६६ आहे. पश्चिमेला गट नं.१६७ आहे. उत्तरेला गट नं.१६६ आहे. दक्षिणेला गट नं.३२ आहे. गट नं.३२ हा किसन देवडकर यांचा आहे.

प्रश्न – गट नं.३२ आणि १६८ मधून रस्ता गेला आहे का.

उत्तर – १६८ मधून गेला आहे.

प्रश्न – रस्ता गट नं.१६८ च्या कोणत्या दिशेला आहे.

उत्तर – पूर्व बाजूला आहे.

रस्त्याच्या शेजारी दक्षिणेला गट नं.३२ आहे.

१९. मी सध्या भारत फोर्स पुणे येथे नोकरीला आहे. मी गेल्या २० वर्षांपासून नोकरीला आहे. गट नं.१६८ ची सरकारी मोजणी २०१७ साली केलेली आहे. त्याच्या पूर्वी सरकारी मोजणी केली नव्हती. जी सरकारी मोजणी केली होती त्यावेळी शेजारच्या पक्षकारांना नोटीस पाठवली होती. त्या मोजणीला मी स्वतः हजर नव्हतो. पण माझा भाऊ हजर होता. जमीन मोजणी केली त्याचे नाव भोई असे आहे. मोजणी दुपारी अंदाजे १२ वाजता केली. किसन देवडकर हे मोजणीला हजर होते.

२०. मला तंबाखूचे व्यसन आहे. मी कधीकधी मद्य प्राशन करतो. गट नं.१६८ मध्ये मी आणि माझा भाऊ सहभागदार आहे. माझे शिक्षण दहावी पास आहे. माझ्यावर कधीही फौजदारी खटला करण्यात आलेला नाही. गट नं.३२ आणि १६८ ची कधीही एकत्रीत मोजणी केली नाही. किसन जगू देवडकर यांचे गट नं.३२ मध्ये अंदाजे ३० ते ३५ वर्षांपासून घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यांच्या घरापासून दक्षिणेला त्यांच्या भावकीची घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्याकडे येण्यासाठी किसन देवडकर वगैरे दक्षिणेकडून उत्तरेकडे येतात.

२१. रस्त्याच्या दक्षिणेला असणारी जागा मी कधीही नोटरी करुन विक्री केलेली नाही. मी त्या जागेसंदर्भात कोणत्याही प्रकारची नोटरी केलेली नाही. मी गेल्या ५ वर्षाच्या कालावधीमध्ये दावा सुरु असताना गट नं.१६८ बाबत कोणताही व्यवहार केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, रस्ता जिल्हामार्ग क्र.५० आहे. रस्त्याच्या मध्यभागापासून माझे घर अंदाजे ६० फुट अंतरावर आहे. रस्ता कोणत्या साली झाला याची मला माहिती नाही. रस्त्यासाठी जागा जेव्हा संपादीत झाली त्यावेळी रस्त्याला सहमती नाही असा जबाब आम्ही दिला नाही.

२२. नाना दगडू शेंडगे यांना मी व माझा भाऊ यांनी करुन दिलेला दिनांक ०८/०१/२०२१ रोजीचा नोटरी दस्त क्र.९०९७ खोटा आहे. नाना दगडू शेंडगे यांना मी व माझा भाऊ यांनी करुन दिलेला दिनांक १२/०७/२०२१ रोजीचा नोटरी दस्त क्र.२१७५ खोटा आहे.

२३. आम्ही गट नं.१६८ मधील जमीन कसतो. त्यामध्ये आम्ही बाजरी आणि भुईमूगचे पीक घेतो. आम्ही रस्त्यापर्यंत जमीन कसत नाही. किसन जगू देवडकर यांचे घर हे रस्त्यापासून अंदाजे ७० ते ७५ फुट अंतरावर आहेत. त्यांच्या घरापासून ते रस्त्यापर्यंत झाडे लावलेली दिसत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणी नारळाची, आंब्याची झाडे दिसतात. त्या ठिकाणी शासनाने लावलेली झाडे देखील दिसत नाहीत.

२४. गट नं.१६८ मध्ये प्रतिवादी क्र.१ यांनी सरकारी मोजणी आणल्यानंतर

त्यातील नकाशानुसार आम्हाला अतिक्रमणाची माहिती झाली. गट नं.३२ ची जेव्हा मोजणी झाली त्यावेळेस मी हजर नव्हतो. माझा भाऊ हजर होता. त्या मोजणीला माझे वडील होते. त्या मोजणीला आमच्या वडीलांनी संमती दिली नाही. गट नं.१६६ च्या मालकाचे नाव मला आठवत नाही. गट नं.१६७ च्या मालकाचे नाव बाबा धुळा देवडकर आहे.

२५. माझे आईवडील गावाला ४ वर्षापासून रहातात. आमचा व किसन देवडकर यांच्या कुटुंबाचा कधीही वादविवाद झाला नाही. गट नं.१६८ याचे क्षेत्र अंदाजे ३२ एकर आहेत. गट नं.३२ हा अंदाजे किती एकराचा आहे याची मला माहिती नाही.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

VINAYAK DATTATRAY PATIL — Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL Date: 2023.06.19 10:15:43 +0530

आटपाडी. (वि. द. पाटील)

दिनांक : १७/०६/२०२३ दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

आटपाडी

*****